जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ 'दूरशिक्षण' शिक्षण केंद्राच्या प्रवेशाची ३१ ऑगस्टपर्यंत मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ साठी बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी.(गणित), एम.बी.ए. (डिस्टन्स मोड), तसेच एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), व एम.बी.ए. (ऑनलाईन मोड) अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस दि. ३१ ऑगस्टपर्यंत मुदत आहे.

ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, जे अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत. अशा विद्यार्थी, गृहिणी, कामगार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, सरकारी कर्मचारी, खासगी कंपनीतील कर्मचारी आदींना दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या विविध अभ्यासक्रमांना असणाऱ्या प्रवेशाच्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्र.संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2025
पुढारी

# कमला कॉलेज राष्ट्रीय शैक्षणिक धोरण संदर्भातील पोस्टर प्रदर्शनास प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ताराराणी विद्यापीठ संचलित कमला कॉलेजमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कक्ष यांच्या वतीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० या विषयावर आधारित पोस्टर प्रदर्शनास विद्यार्थिनींचा प्रतिसाद लाभला. प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांच्या हस्ते झाले.

पोस्टर प्रदर्शनात विद्यार्थिनींनी सहभाग घेऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील महत्त्वाच्या मुद्द्यांवर भाष्य केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कक्ष प्रमुख प्रा. मनीषकुमार चव्हाण यांनी उपक्रमाचे नियोजन केले. प्रा. डॉ. सुजय पाटील व प्रा. डॉ. नीता धुमाळ यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. यावेळी डॉ. सागर वाळवेकर, डॉ. प्रवीण चौगुले, डॉ. विश्वनाथ तराळ, प्रा. स्वाती कांबळे, डॉ. तानाजी घागरे, प्रा. नीलेश क्षीरसागर, प्रा. ए. के. पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2025
लोकमत

# शाहू कॉलेजमध्ये छायाचित्र प्रदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कदमवाडी येथील राजर्षी छ. शाहू कॉलेजमध्ये स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांच्या कार्याची माहिती देणारे छायाचित्रांचे प्रदर्शन झाले. महाविद्यालयाचा सांस्कृतिक, इतिहास, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे यांच्या सहकार्याने ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून हा उपक्रम झाला.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. डी. आर. भोसले यांच्या हस्ते उद्घाटन झाले. कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टचे चंद्रकांत शहासने यांनी मनोगत व्यक्त केले. उपप्राचार्य प्रा. पी. एस. चौगुले, डॉ. ए. पी. उबाळे, उपप्राचार्या डॉ. एम. बी. देसाई, उपप्राचार्या प्रा. एल. बी. चव्हाण, डॉ. यु. एस. शेळके, डॉ. एस. पी. खोले, डॉ. जी. एम. लवंगारे आदी उपस्थित होते. (वा. प्र)